शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

(सीआयएन - यु ९९९९९ एमएच १९७० एसजीसी - ०१४५७४)

सिडको
शहरांचे शिल्पकार

क्र. सिडको/का. अ. (वाशी)/२०२६/438 दिनांक : १५/०५/२०२६

**प्रति,**

१) वनपरिक्षेत्र अधिकारी, नवी मुंबई, कांदळवन विभाग,
घणसोली गट नं. १०९, सेक्टर – १०, गगनगिरी महाराज मार्ग,
पाम बीच रोड, घणसोली, नवी मुंबई – ४०० ७०१

२) कार्यकारी अभियंता, बेलापूर विभाग,
नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई.

**विषय:** मौजे करावे येथील डि. पी. एस. शेजारील भूखंडावर पाणी ये-जा होण्याकरिता उघडे ठेवलेले पाईप जमिनीत व्यवस्थित बसवून घेणेबाबत.

**संदर्भ:** जा. क्र./न . मु. का. वि./जमीन/१४३/सन २०२६-२७ दिनांक ०६/०५/२०२६

महोदय,

आपले दि. ०६/०५/२०२६ रोजीचे पत्र या कार्यालयात दि. ०८/०५/२०२६ रोजी प्राप्त झाले आहे. सदर पत्रामध्ये आपण नमुद केले आहे की, मौजे. वाशी येथील जनता दरबारामधील आदेशान्वये आपण व नवी मुंबई महानगरपालिका यांनी सिडकोचा भुखंड (डी पी एस शाळेजवळील) सिमेंट पाईपचे खोली वाढविण्याचे काम सुरू असताना सिडको कार्यालयातील अधिकारी यांनी काम बंद केले असे नमुद केले आहे. सदर पत्राद्वारे आपण खालील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

1. नेरुळ, सेक्टर-५२ येथे सुमारे १२ हेक्टरचा मोकळा जमिनीचा भूभाग हा CIDCO च्या ताब्यात आहे. हा भूभाग नेरुळ येथील DPS शाळेच्या अगदी जवळ असून, आजतागायत त्याचा विकास करण्यात आलेला नाही. महसूल विभागाच्या अभिलेखानुसार कुठलाही नैसर्गिक तलाव नाही, (एखाद्या स्वयंसेवी संस्थेने याला "तथाकथित DPS तलाव" असे संबोधले आहे). CIDCO च्या नेरुळ (नवी मुंबई) च्या नोडल आराखड्यामध्ये या जागेची नोंद "भविष्यातील विकास" (Future Development) म्हणून करण्यात आली आहे.

2. सर्व्हे क्रमांक २६६ चे एकूण क्षेत्रफळ सुमारे ८६.० हेक्टर इतके आहे, यापैकी विकसित भागांमध्ये सेक्टर-५० (पूर्व), STP (सांडपाणी प्रक्रिया केंद्र), 'होल्डिंग पॉन्ड' (पाणी साठवण तलाव) आणि सेक्टर-५० (पश्चिम) येथील ५० मीटर रुंद जलवाहिनी (Channel) इत्यादींचा समावेश होतो. तसेच DPS शाळा आणि तिचे क्रीडांगण हे देखील याच सर्व्हे क्रमांकाचा एक भाग आहेत.

3. नेरुळ, सेक्टर-५२ येथील सदर जमिनीचा भूभाग खाडीला लागून आणि तिच्या अगदी जवळ स्थित आहे; या दोन्हीच्या दरम्यान केवळ एक अस्तित्वात असलेला बंधारा/रस्ता आहे. भारताच्या मुख्य जलसर्वेक्षक (Chief Hydrographer) यांनी 'उच्च भरती रेषा' (HTL - High Tide Line) निश्चित केली असून, याच रेषेचा आधार घेण्यात आला आहे. CRZ (किनारी नियमन क्षेत्र) अधिसूचना २०१९ नुसार, 'किनारी क्षेत्र

व्यवस्थापन आराखडा' (CZMP) हा पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून (MoEF&CC) मंजूर करण्यात आला आहे. या मंजूर CZMP-2019 नुसार, नेरुळ, सेक्टर-५२ मधील जमिनीचा एक छोटासा भाग (जो अस्तित्वात असलेल्या बंधाऱ्याला/रस्त्याला लागून आहे) हा CRZ-II अंतर्गत येतो.

4. सुमारे २०१० मध्ये, सिडकोने (CIDCO) DPS शाळेला लागून असलेल्या उर्वरित जमिनीचा विकास करण्यास सुरुवात केली; परंतु, या उर्वरित मोकळ्या जमिनीच्या विकासाला आक्षेप घेत, लगतच्या गृहनिर्माण संस्था/रहिवाशांनी माननीय उच्च न्यायालयात जनहित याचिका (PIL 218/2013) दाखल केली होती.

5. PIL 218/2013 आणि PIL 58/2018 या जनहित याचिकांच्या संदर्भात, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०१.११.२०१८ रोजी दिलेल्या अंतिम आदेशात असे निर्देश दिले की, प्राप्त जागेचे संरक्षित आणि जतन करणे, तसेच त्यांची कोणत्याही प्रकारे हानी होणार नाही याची खात्री करणे, हे सिडको, इतर स्थानिक प्राधिकरणे आणि राज्य सरकार यांचे कर्तव्य आहे, असे आदेश पारीत केलेले आहे.

6. सदर आदेशाला सिडकोने माननीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या संदर्भातील विशेष रजा याचिका (SLP) क्रमांक SLP (C) 16310 – 16311/2019 आणि SLP (C) 16313 – 16314/2019 या सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबितअसून सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

7. सध्याची जमिनीची पातळी (Ground Level) ही लगतच्या रस्त्याच्या पातळीपेक्षा खाली आहे; परिणामी, पावसाळ्यात या ठिकाणी पावसाचे पाणी साचून राहते. उन्हाळ्याच्या हंगामात हे साचलेले पाणी आटून जाते.

8. त्यानंतर, नवी मुंबई महानगर पालिकेच्या एका कंत्राटदाराने JCB च्या साहाय्याने बंधाऱ्याचा रस्ता (bund road) खोदून काढला; तसेच तेथे पूर्वीपासून असलेला ३०० मिमी व्यासाचा पाण्याचा निर्गम पाईप (जो CIDCO ने बसवला नव्हता) काढून टाकला. त्याऐवजी, खाडीचे पाणी सदर भागात प्रवेश करू देण्यासाठी ६०० मिमी व्यासाचा RCC पाईप बसवला. पुढे, बदललेल्या पाईप्सच्या लगतच ६०० मिमी व्यासाच्या पाईप्सची आणखी एक रांग बसवण्यात आली; परिणामी, वरील नमूद केलेल्या भागात खाडीचे पाणी आत घेण्यासाठी ६०० मिमी व्यासाच्या पाईप्सच्या दोन रांगा तयार झाल्या. याव्यतिरिक्त, खाडीचे पाणी वरील जमिनीच्या भूखंडात उपसून घेण्यासाठी कंत्राटदाराने १० HP क्षमतेचे २ पंप देखील कार्यान्वित केले. येथे हे नमूद करणे उचित ठरेल की, सदर जमिनीच्या भूखंडात पाण्याचा कोणताही नैसर्गिक प्रवाह अस्तित्वात नाही. या संपूर्ण बाबीबाबत CIDCO ने दिनांक २९/०७/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे NMMC च्या आयुक्तांना यापूर्वीच अवगत केले आहे. तदनंतर CIDCO च्या अधिकाऱ्यांनी दिनांक २२/०४/२०२६ रोजी केलेल्या स्थळ पाहणीदरम्यान असे निदर्शनास आले की, पुन्हा सदर बंधारा बेकायदेशीररित्या फोडून पाईप बसवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे; परिणामी, लगतच्या विकासयोग्य मोकळ्या क्षेत्रात खाडीचे पाणी शिरकाव करत आहे. सदर काम वन विभागाचे कर्मचारी/अधिकारी यांच्या उपस्थितीत, परंतु कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडून तसेच मा. न्यायालयाची पूर्वपरवानगी न घेताच करण्यात आले आहे.

9. सदर मुद्दा दिनांक ३०/०४/२०२५ रोजीच्या बीएम क्रमांक ६५८ व्या बैठकीत (विषय क्रमांक ०९) सिडको मंडळासमोर मांडण्यात आला. सिडको मंडळाने सदर प्रकरणावर सविस्तर चर्चा केली आणि भूखंडाच्या वस्तुस्थितीची माहिती सरकारला कळवण्याचा व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (NMIA) परिसरातील पक्षी अभ्यासासाठी एका आंतरराष्ट्रीय सल्लागाराची नियुक्ती करण्याचा ठराव केला.

त्यानुसार, सिडकोने दिनांक १२/०६/२०२५ रोजी राज्य सरकारला कळवले आहे आणि वस्तुस्थितीचा विचार करून संवर्धन राखीव क्षेत्र / अभयारण्य घोषित करण्याचा विचार करू नये, अशी विनंती केली आहे.

विमानतळ आणि परिवहन विभाग - सिडकोने, NMIA "पक्षी धोका मूल्यांकन अहवाला" साठी मे. एव्हिसर (M/s. AVISURE) या आंतरराष्ट्रीय सल्लागाराची नियुक्ती केली आहे. मे. एव्हिसरने असेही सुचवले आहे की, जोपर्यंत विमान वाहतुकीसाठी स्थानिक आणि तात्कालिक धोक्यांचे निश्चित मूल्यांकन पूर्ण होत नाही, तोपर्यंत सदर भुखंडाला, संवर्धन क्षेत्र म्हणून घोषित करणे किंवा त्यांना अपरिवर्तनीय कायदेशीर संरक्षण देणे टाळावे.

10. आपणास आवर्जून कळविण्यात येते कि, सदर भूखंड हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पासून २ किलोमीटर च्या हद्दी मध्ये असल्याने, विमानतळा पासून परिसरात पक्षांचा वावर हा, विमान प्रवासामध्ये अडथळा निर्माण करून जीवितहानी होण्याची शक्यता असल्यामुळे प्रतिबंधित केलेला असून, सदर माहित हि राज्य शासनास सिडको द्वारे दिनांक ०४/१०/२०२४, १२/०६/२०२५, ०५/०५/२०२६ व २५/०१/२०२१६ रोजीच्या पत्राद्वारे वारंवार कळविण्यात आलेली आहे.

माहितीस्तव सादर.

Dansvd 15/05/2026

**कार्यकारी अभियंता (वाशी)**

१ला मजला, जुनी प्रशासकीय इमारत, सिडको

सेक्टर क्र. १ वाशी, नवी मुंबई